प्रकरण -१८

इतर उपयुक्त माहिती

## इतर उपयोगी माहिती:

18-1 लोकांकडून वारंवार विचारले जाणारे प्रश्न :-

1) औषधाची उपलब्धता.

2) क्ष-किरणफिती आणि हृदयस्पंदन-आलेख या सोयीची उपलब्धता.

3) लसीकरण.

18-2 --

18-3 रुग्णांना आरोग्यविषयक सल्ला वैद्यकीय अधिकारी, परिचारिका यांचेकडून त्यांच्या कामकाजाच्या वेळेत दिला जातो.

18-4 रुग्णालयाकडून विहित शुल्क आकारणी करुन रुग्णांना वैद्यकीय दाखला दिला जातो.

1) रुग्णाने बाहय-रुग्ण विभागात किंवा आंतर-रुग्ण-विभागात जर उपचार घेतले असतील तर त्यांना रु.30/-शुल्क आकारणी करुन वैद्यकीय दाखला दिला जातो.

2) जर वयाचा दाखला हवाअसेल त्याच्या जवळील एखादा पुरावा,फोटो पाहून त्यानुसार जेष्ठ नागरिकत्वाचा दाखला किंवा वयाचा दाखला रु .30/-शुल्क आकारणी करुन दिला जातो.

3) एखादया रुग्णांनी जर रुग्णालयाच्या अपघात विभागात येऊन उपचार घेतले असतील, त्याला दुखापत-दाखला त्याच्या बाहय रुग्ण विभागाच्या वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार तसेच त्याने सादर केलेल्या अर्जानुसार रु.100/ शुल्क आकारणी करुन दिला जातो.

4) एखादा रुग्ण रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाला परंतु तो मरण पावला, व त्याचा जीवनविमा उतरवला असेल तर त्यासंबंधित त्याच्या नातेवाईकांनी जर कागदपत्रे रुग्णालयात

अर्जासहित सादर केली  तर त्या कागदपत्रात उपचारासंबंधीत माहिती भरुन दिली जाते, त्यासाठी रु. 150/-  एवढे शुल्क आकारले जाते.

5) अपंगत्वाचा दाखला रुग्णला विशिष्ट विभागातील (उदा: अस्थिव्यंग) मानसेवी सहाय्यक वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार  वैद्यकीय अधिकारी यांच्या  अधिपत्याखाली रु.150/- शुल्क आकारणी करुन दिला जातो.

6) मृत्युचा मूळ दाखला आणल्यास  आणि ज्या वाहनामधून प्रेत घेऊन जाणार आहेत त्या वाहनाचा नंबर  दिला तरच त्या रुग्णाचे प्रेत  मुंबई बाहेर नेण्यास ना-हरकत दाखला दिला जातो त्याबद्दल कोणतीही शुल्क आकारणी केली जात नाही. अर्ज 24 तास अपघात विभागात उपलब्ध.